# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.01.2025** **वार-शुक्रवार**

---

**जीबीएस**

राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेच्या संशोधनाद्वारे गुइलेन बॅरे सिंड्रोम अर्थात जीबीएस ची बाधा कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणू आणि नोरोव्हायरस या विषाणूमुळे झाल्याचं निष्पन्न झालं आहे. या जिवाणू आणि विषाणू दोन्हींचा संसर्ग दूषित अन्न अथवा पाण्यातून होतो. याचबरोबर या दोन्हीची लक्षणेही पोटदुखी, उलट्या आणि जुलाब ही आहेत. हा संसर्ग झाल्यानंतर रुग्णांची प्रतिकारशक्ती शरीरातील चेतासंस्थेवर हल्ला करते. त्यांना 1 ते 3 आठवड्यांनी गुइलेन बॅरे सिंड्रोम होतो. या विकाराचा रुग्ण योग्य उपचारानंतर बरा होतो. नागरिकांनी पिण्याचं पाणी उकळून प्यावं. याचबरोबर बाहेरील खाद्यपदार्थ खाणं टाळावं. या विकाराची कोणतीही लक्षणं आढळून आल्यास नागरिकांनी तातडीनं डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असं न्यूरॉलॉजिकल सोसायटी ऑफ पुणेचे अध्यक्ष डॉ. राहुल कुलकर्णी यांनी सांगितलं आहे.

**सर्वेक्षण**

दरम्यान, गुलियन बॅरी सिंड्रोमच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेनं 64 पथके नेमली आहेत. या भागात रुग्णांचे सर्वेक्षण करायला सुरूवात केली आहे. यामध्ये एक आशा कर्मचारी आणि एक नर्स यांचा समावेश असून हे दोनजण प्रत्येक घरी जाऊन माहिती घेणार आहेत. या भागांत मोठ्या टाउनशीपच्या सुरक्षा प्रशासनाने या सर्वेक्षणासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावं, असंही आवाहन महापालिकेनं केलं आहे.

पुणे शहरात गुईलेन बॅरी सिंड्रोम चे संशयित रुग्ण आढळलेल्या नांदेड, नांदोशी, किरकिटवाडी, धायरीच्या काही भागाला पुणे महापालिका विहीरीतुन विनाप्रकिया केलेले पिण्याचे पाणी देत आहे. पण नांदेड आणि बारांगणे मळा इथल्या विहिरी आणि जलस्त्रोतांमध्ये कोणतेही दूषित घटक आढळलेले नाहीत असा प्राथमिक अहवाल आला आहे. मात्र, खबरदारी म्हणून क्लोरिनची दुप्पट मात्रा वापरण्याचे आदेश दिल्याचं आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितलं आहे.

**स्मारक**

कोरेगाव भीमा इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं स्मारक आणि स्तंभ उभारावा यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू करणार असल्याची माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. सरकारने जवळपास दीडशे एकर जमीन वर्ग करावी, स्मारक आणि स्तंभ प्रकल्पासाठी समाज कल्याण खात्यानंही यावर लवकर अहवाल द्यावा. या उपक्रमासाठी वास्तू विशारद यांची नेमणूक करण्यासाठी दहा कोटी रुपये निधीची मागणी केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**आम्ही भारताचे लोक**

भारतीय संविधानाला यंदा 75 वर्षे पूर्ण होत असून या अमृत वर्षानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं 'आम्ही भारताचे लोक' हा कार्यक्रम 26 जानेवारी रोजी सायंकाळी 5.30 वाजता पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक इथं आयोजित करण्यात आला आहे. संविधानाच्या प्रस्ताविकेच विविध 15 भाषांमध्ये गायन करून, भारतीय संविधानाला सांगीतिक मानवंदना देण्यात येणार असून याची गीनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद करण्यात येणार आहे.

**ज्युडो**

भारतीय ज्युडो महासंघाच्या वतीनं पुण्यातल्या महाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात कॅडेट गटाच्या राष्ट्रीय ज्युडो स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेत 15 ते 18 वयोगटातील कॅडेट श्रेणीच्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघानं दोन कांस्यपदकाची कमाई केली. यामध्ये 52 किलो खालील गटात सांगलीच्या दक्षा नाईक हिनं तर 66 किलो खालील गटात क्रीडा प्रबोधिनीच्या वीरधवल मते यांनी पदके जिंकली.

**टेनिस**

ग्लोबल वरिष्ठ टेनिस संघटनेच्या वतीनं सोलारिस करंडक वरिष्ठ पुरूष राष्ट्रीय टेनिस स्पर्धा पुण्यात पार पडल्या. स्पर्धेत पुण्याच्या नितीन किर्तने, मुंबईच्या संदीप पवार आणि व्हि. शंकर यांनी एकेरी आणि दुहेरीच्या गटाचे विजेतेपद मिळवून दुहेरी मुकूट पटकावला. स्पर्धेच पारितोषिक वितरण सोलारीसचे संचालक जयंत पवार आणि सोलारीस चे सीईओ हृषीकेश भानुशाली यांच्या हस्ते करण्यात आलं.

**निधन**

मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व रामचंद्र अण्णाजी उर्फ रामभाऊ जोशी यांचं काल रात्री पुण्यात वृध्दापकाळानं निधन झालं. ते 101 वर्षांचे होते. दैनिक केसरी मध्ये त्यांनी पत्रकार म्हणून काम केलं. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या स्थापनेमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. सवाई गंधर्व महोत्सवाच्या स्थापनेपासून ते मंडळाशी निगडित होते. धडाडीचा पत्रकार या व्याख्येत बसणारा, पत्रकारांच्या तीन पिढ्यांचा कृतीशील मार्गदर्शक हरपला, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहिली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून रामभाऊंनी राजकारण, समाजकारणाला दिशा देण्याचं काम केलं, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हणलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं होतं. कमाल तापमान 33 तर किमान तापमान 14 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या आकाश निरभ्र तर सकाळी विरळ धुकं असण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**